RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ४, अंक ८७] मंगळवार, जुलै ३, २०१८/आषाढ १२, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक २२८

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले .**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**

मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२, दिनांक ३ जुलै, २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००.**

क्रमांक : सीबीसी/२०१६/प्र.क्र.२१३/मावक महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३) याच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि या बाबतीत त्यास समर्थ करण्या-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ मधील नियमात खालील बदल करीत असून, उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करीत आहे.

१. या नियमांना महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन)(दुसरी सुधारणा) नियम, २०१८ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र

देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ (इथून पुढे " मुख्य नियम " असा उल्लेख करण्यात येईल.) त्याच्या कलम ११ मधील उपकलम (क) मध्ये " महाराष्ट्र शासनाचे सहसचिवपेक्षा कमी दर्जाचे नसलेले अधिकारी " या शब्दापुढे किंवा " अतिरिक्त आयुक्त समाज कल्याण " हे शब्द जोडण्यात येत आहेत.

आणि उपकलम (ग) मध्ये " विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी " या शब्दापुढे किंवा " समाज कल्याण अधिकारी, गट-ब " हे शब्द जोडण्यात येत आहेत.

३. कलम १८ उपकलम (४) मध्ये " सदस्य सचिव " या शब्दाऐवजी " सदस्य (उपायुक्त समाज कल्याण किंवा प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण) " असा बदल करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**दिनेश वाघमारे,**
सचिव,
महाराष्ट्र शासन.

---

SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMANT,
Mantralaya, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai - 400 032.
Dated the 3rd July, 2018.

NOTIFICATION

**MAHARASHTRA SCHEDULED CASTES, SCHEDULED TRIBES, DENOTIFIED TRIBES (VLMUKTA JATIS), NOMADIC TRIBES, OTHER BACKWARD CLASSES AND SPECIAL BACKWARD CATEGORY (REGULATION OF ISSUANCE AND VERIFICATION OF) CASTE CERTIFICATE ACT, 2000.**

No. CBC2016-C.R.-213-B.C.W. - The Government of Maharashtra is amending the Maharashtra Scheduled Castes, Denotified Tribes *(Vimukta Jatis),* Nomadic Tribes,Other Backwad Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of ) Caste Certificate Rules 2012, In exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 18 of the Maharashtra Scheduled Castes, Scheduled Tribes, Denotified Tribes *(Vimukta Jatis),* Nomadic Tribes,Other Backwad Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Act, 2000 (MAH XXIII of 2001), and of all other powers enabling it is that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules, the same having been previously published as required by sub-section *(1)* of the said Section 18, namely:-

1. These rules may be called the Maharashtra Scheduled Castes, Denotified Tribes *(Vimukta Jatis),* Nomadic Tribes,Other Backwad Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of ) Caste Certificate (Second Amendment) Rules, 2018.

2. In the rule 11 of the Maharashtra Scheduled Castes, Denotified Tribes *(Vimukta Jatis),* Nomadic Tribes, Other Backwad Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of ) Caste Certificate Rules, 2012 (hereinafter referred to as "the principal Rules") in clause *(a),* after the words "Rank of Joint Secretary to State Government" the words or "Additional Commissioner Social Welfare" shall be added at the end.

And in clause (c) after the words "Special District Social Welfare Officer" the words or "Social Welfare Officer, Group B" shall be added at the end.

3. In the rule 18 of principal rules, in clause (4) for the words "Member Secretary" the word "Member" (Deputy Commissioner Social Welfare or Regional Deputy Commissioner Social Welfare) shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

DINESH WAGHMARE,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR I/C, MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT PRESS, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004., EDITOR : SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.